# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### मुंबई शहरातील नरिमन पॉईंट ते बोरिवली जलवाहतूक सुरु करण्याबाबत

**(१) १५ (२२-१२-२०१४). श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील वाहतूकीचा ताण कमी करण्याच्या उद्देशाने व नागरीकांना जलद, पर्यायी वाहतूकीची व्यवस्था करुन देण्यासाठी केंद्र शासनाने नरिमन पॉईंट ते बोरिवली जलवाहतूक सुरु करण्याची घोषणा माहे जुलै, २०१४ वा त्यादरम्यान केली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सदर जलवाहतूक सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०३-२०१५) :** (१), (२) व (३) केंद्र शासनाने नरीमन पॉईंट ते बोरीवली जलवाहतूक सुरु करण्याची घोषणा केलेली नाही. तथापि अशी सेवा सुरु करण्याची बाब राज्य शासनाच्या विचाराधीन आहे.

---

### नवी मुंबईतील मिठागर कामगारांचा पुनर्वसनाचा प्रश्न प्रलंबित असल्याबाबत

**(२) २० (२३-१२-२०१४). श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा. वर्षा गायकवाड (धारावी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील मिठागर कामगारांचा पुनर्वसनाचा प्रश्न प्रलंबित असल्याचे माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवी मुंबईतील मिठागर कामगारांचा पुनर्वसनाचा प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०३-२०१५)** :(१), (२) व (३) नवी मुंबई महानगराचा विकास सिडको मार्फत करण्यात आला असून सदर नवनगर प्रकल्पांतर्गत समाविष्ट जमिनीवरील मिठागर कामगारांचे पुर्नवसनासंदर्भात सिडकोचे विवक्षित धोरण नाही. तथापि, नवी मुंबई नवनगर प्रकल्पाकरिता जमीन संपादनामुळे बाधित पात्र भूमिहीन शेतमजूर, भूमिहीन मिठागर कामगार व भूमिहीन ग्रामकारागीर यांना ४० चौरस मीटर भूखंड वाटप करण्याचे सिडकोचे धोरण आहे.

सर्व मिठागर कामगारांना मिठागर जमिनीच्या साडेबारा टक्के प्रमाणात समान न्यायाने भूखंड मिळावेत व मिठागर कामगारांना नुकसान भरपाई मिळावी अशा स्वरुपाची मागणी असलेले निवेदन माहे, ऑगस्ट, २०१४ मध्ये सिडकोकडे प्राप्त झाले असून सिडकोस्तरावर त्याची तपासणी करण्यात येत आहे.

---

**मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज व डॉ.बाबासाहेब आंबडेकर यांचे स्मारक उभारण्याबाबत**

**(३) ५९७ (२२-१२-२०१४). श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. राहुल मोटे (परांडा), श्री. सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय स्मारक उभारणे, इंदू मिलच्या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबडेकर यांचे भव्य स्मारक उभारणे, मुंबईतील कोळीवाड्यांच्या विकास इ.प्रलंबित प्रकल्पांवर निर्णय घेण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक ६ नोव्हेबर, २०१४ रोजी मा.कैंद्रिय पर्यावरणमंत्री यांची भेट घेतलेली होती, खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) सदर प्रकल्पाची कामे अधिक जलद गतीने पूर्ण करण्यासाठी कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे?

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०३-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय स्मारक उभारण्यासाठी निश्चित केलेली अरबी समुद्रातील जागा सीआरझेड-४ क्षेत्रात येत असल्यामुळे सदर क्षेत्रात स्मारकाचे बांधकाम करण्याची सवलत मिळण्यासाठी पर्यावरण व वन मंत्रालय, केंद्र सरकार यांनी दि. १७.०२.२०१५ च्या अधिसूचनेमध्ये सीआरझेड-४ क्षेत्रात स्मारक बांधण्यास सवलत दिली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारकाच्या परवानगीकरीता केंद्र शासनाला फेब्रुवारी, २०१५ मध्ये प्रस्ताव पाठविला आहे.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्यासाठी इंदू मिल क्र.६ ची जागा देण्याच्या झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने आवश्यक ते हमीपत्र राज्य शासनाने केंद्र शासनास

दिनांक १७.११.२०१४ च्या पत्रान्वये पाठविले आहे. यासंदर्भात पुढील कार्यवाही केंद्र शासन स्तरावरुन अपेक्षित आहे.

बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीनुसार कोळीवाड्यासाठी तरतूदी नव्हत्या. शासन अधिसूचना, दिनांक ८.५.२०१२ च्या कलम ३७ (२) खालील अधिसूचनेत गावठाण ऐवजी गावठाण व कोळीवाडा असा शब्दप्रयोग अंतर्भूत केल्यामुळे गावठाणांप्रमाणे कोळीवाड्याचा विकास अनुज्ञेय झालेला आहे. महसूल अभिलेख्यामध्ये कोळीवाड्याची नोंद करण्यासाठी कोळीवाड्यांचे सर्वेक्षण करुन सिमांकन करण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दती व मार्गदर्शक तत्वे विहित करण्यासाठी गठीत समितीने आपला अहवाल महसूल व वन विभागास सादर केला आहे. यासंदर्भात पुढील कार्यवाही सुरु आहे.

वरील प्रत्येक प्रकरणी स्वतंत्र पुणे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गुजरातमधील दमणगंगा आणि ठाणे जिल्ह्यातील पिंजाळ**
**या दोन नद्यांच्या जोडणी प्रकल्पासंदर्भात**

**(४) ६०५ (१५-०१-५०१५). श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व परिसरातील वाढत्या लोकसंख्येला पाणीपुरवठा करण्यासाठी गुजरातमधील दमणगंगा आणि ठाणे जिल्ह्यातील पिंजाळ या दोन नद्यांच्या जोडणी प्रकल्पासंदर्भात राष्ट्रीय जलविभाग संस्थेने विस्तृत विकास आराखडा तयार केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) उक्त प्रश्नी तयार केलेल्या आराखड्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१३-०३-२०१५) :**(१) होय, अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र व गुजरात राज्याच्या सिमेवरील दमणगंगा या आंतरराज्य नदी व ठणे जिल्ह्यातील पिंजाळ या दोन नद्यांच्या जोडणी प्रकल्पासंदर्भात राष्ट्रीय जलविकास अभिकरणाने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केलेला आहे.

(२) दमणगंगा नदीवर भूगड येथे व वाघ नदीवर खारगीहील येथे धरणे बांधून ही धरणे बोगद्याद्वारे जोडणे प्रस्तावित आहे. तसेच पुढे या दोन धरणातील पाणी पिंजाळ धरणात बोगद्याद्वारे आणणे प्रस्तावित आहे. या योजनेमुळे मुंबई शहरासाठी वार्षिक ५७९ दलघमी (१५८६ दशलक्ष लिटर प्रतिदिनी) पाणी उपलब्ध होऊ शकते. योजना राष्ट्रीय प्रकल्प म्हणून हाती घेणेबाबत केंद्र शासनास विनंती करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कर्ले, परसुळे (ता.शिंदखेडा जि.धुळे) या गावांतील गांवतलावात फोफाढे धरणाच्या पाटचारीद्वारे पाणी टाकण्याच्या मागणीबाबत**

**(५) ८१५ (२२-१२-२०१४). श्री. जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कर्ले, परसुळे (ता.शिंदखेडा जि.धुळे) या गावांतील शेतक-याचा सिंचनाचा आणि पिण्याचा पाण्याचा प्रश्न अवलंबून असणा-या गांवतलावात फोफाढे धरणाच्या पाटचारीद्वारे पाणी टाकण्याची मागणी सातत्याने होत आहे, याबाबत सिंचन विभागाने सर्वेक्षण करावे असे आदेश स्थानिक लोकप्रतिनिधींनी दोन वर्षापासून दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावांना दुसाणेकडून बळसाणेकडे जाणा-या पाटचारीद्वारे पाणी आणून त्याद्वारे डोंगराळ भागातून नैसर्गिक उताराद्वारे पाणी टाकणे शक्य आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे?

**श्री. गिरीष महाजन (१२-०३-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रशासकीय मान्यता अहवालानुसार बुराई मध्यम प्रकल्पाच्या पाणी वापराचे पूर्ण नियोजन झालेले आहे. उक्त मागणीसाठी प्रकल्पाच्या जलनियोजनात पाण्याची तरतूद नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील (ता.कर्जत) राजनाला कालव्याचे काम अपूर्ण असल्याबाबत**

**(६) ८३१ (२२-१२-२०१४). श्री. सुरेश लाड (कर्जत), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील (ता.कर्जत) राजनाला कालव्याचे काम सन २०१०-२०११ पासून सुरु असून राजनाला दुरुस्तीच्या कामामुळे पाणी सोडण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच शेतक-यांना गेल्या ४ वर्षापासून भात शेतीचे पिक घेता आले नाही, राजनाला कालव्याची काही कामे अपूर्ण असल्याने जमीन तातडीने ओलिताखाली यावी म्हणून शासनाने कोणती तातडीची उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) सदर अपूर्ण कामे त्वरित पूर्ण करुन माहे डिसेंबर, २०१४ अखेरपर्यंत पाणी सोडण्यात येणार आहे काय,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०३-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.

दुरुस्तीच्या कामामुळे सन २०१०-११, सन २०११-१२ व सन २०१२-१३ मध्ये पाणी सोडण्यात आलेले नाही. तथापि सन २०१३-१४ मध्ये कालाव्यामध्ये पाणी सोडण्यात आलेले आहे.

(२) अत्यंत तातडीची कामे पूर्ण करुन दि.१५/१२/२०१३ रोजी मुख्य कालव्यातून प्रायोगिक तत्वावर पाणी सोडण्यात आले होते. तसेच कोकण हंगाम सन २०१४-१५ मध्ये लाभार्थ्यींच्या मागणीप्रमाणे पाणी सोडण्यात आलेले आहे.

(३) होय,

कोकण हंगाम सन २०१४-१५ मध्ये ८०४ हे. सिंचन क्षेत्रास पाणी सोडण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. त्यानूसार दि. १५/१२/२०१४ रोजी मागणीप्रमाणे पाणी सोडण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाशी येथील हिरानंदानी हेल्थकेअर प्रा.लि. या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलने महानगरपालिकेने सुचविलेल्या ८०० रुग्णांवर दरवर्षी मोफत उपचार आणि औषधे देण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(७) ८६६ (२३-१२-२०१४). श्री. प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशी येथील हिरानंदानी हेल्थकेअर प्रा.लि. या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलने महानगरपालिकेने सुचविलेल्या ८०० रुग्णांवर दरवर्षी मोफत उपचार आणि औषधे देण्याचा महानगरपालिकेकडे पाठविलेला प्रस्ताव आठ महिने होऊनसुध्दा त्यावर कोणताही निर्णय झाला नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव गरजू रुग्णांची होत असलेली गैरसोय पाहता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०३-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) वाशी येथील हिरानंदानी हेल्थ केअर प्रा.लि. बाबत दोन जनहित याचिका दाखल असल्याने सदर प्रस्तावाबाबत पुढील निर्णय घेता येईल काय, याबाबत नवी मुंबई महानगरपालिकेकडून तपासणी करण्यात येत आहे. सदर तपासणीनंतर याप्रकरणी पुढील कार्यवाही महानगरपालिकेतर्फे करण्यात येईल.

---

**भोई समाजास रेनके आयोग लागु करण्याबाबत**

**(८) ९३० (२२-१२-२०१४). श्री. आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोई समाजास अनुसूचित जमातीच्या सवलती मिळवून देण्याकरीता तसेच रेनके आयोग लागु करण्याकरिता भोई समाज क्रांती दल, महाराष्ट्र प्रदेश यांनी वारंवार शासनाकडे पत्र व्यवहाराद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त मागणीवर काय निर्णय घेतला आहे वा घेणार आहे ,

(३) नसल्यास, भोई समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती देण्याकरीता तसेच रेनके आयोग लागु करण्याकरीता शासन कोणती उपाययोजना करणार आहे काय ?

**श्री. विष्णु सवरा (०३-०३-२०१५) :** (१) व (२) जिल्हाध्यक्ष, भोई समाज क्रांती दल, महाराष्ट्र प्रदेश, शाखा पिप्राळा जि.जळगांव यांचे जिल्हाधिकारी, जळगाव यांना लिहिलेले दि.२२.८.२०१४ रोजीचे निवेदन प्राप्त झालेले आहे.

भोई समाजास अनुसूचित जमातीच्या सवलती मिळण्यासंदर्भात नमूद करण्यात येते की, केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्यासाठी घोषित केलेल्या अनुसूचित जमातींच्या यादीमध्ये भोई जमातीचा समावेश नाही. अनुसूचित जमातीची यादी केंद्र शासनामार्फत प्रसिध्द करण्यात आली असून त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार केवळ केंद्र शासनास आहेत. एखाद्या समाजाचा अथवा जाती/जमातीचा अनुसूचित जमातीच्या यादीत समावेश करण्यासाठी केंद्र शासनाने खालील निकष निर्धारित केलेले आहेत :-

१) प्राचिन जीवनमान

२) भौगोलिक अलिप्तता

३) भिन्न संस्कृती

४) स्वभावातील बुजरेपण आणि

५) मागासलेपणा

महाराष्ट्र राज्याच्या बाबतीत, भोई जमात ही अनुसूचित जमातीच्या यादीत समाविष्ट करण्यासाठी केंद्र शासनाने निर्धारित केलेले वरील निकष पूर्ण करीत नाही. त्यामुळे सदर जमातीचा अनुसूचित जमातीच्या यादीत समावेश नाही.

महाराष्ट्र राज्याच्या भटक्या जमाती - ब च्या यादीत अ.क्र.२५ वर भोई समाजाचा तिच्या तत्सम जमातीसह अंतर्भाव केलेला आहे. त्यांना भटक्या जमाती - ब साठी लागू असलेल्या सवलती अनुज्ञेय आहेत.

मा.श्री.बाळकृष्ण रेणके आयोगाची नियुक्ती केंद्र शासनाकडून केली आहे. सदर आयोगाच्या शिफारशी लागू करणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितील असून त्याबाबत केंद्र शासनाकडून सूचना प्राप्त झाल्यावर, राज्य शासनाकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगांव (जि.बुलडाणा) च्या गैरकारभाराबाबत**

**(९) ९३४ (२२-१२-२०१४). श्री. आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगांव येथे महसूलाचे नुकसान होत असल्याबाबतची तक्रार श्री.नंदलाल रमणलाल भट्टड (रा.खामगांव, जि.बुलढाणा) यांनी दिनांक ०३ मे, २०१२ रोजी वा त्यासुमारास मा.लोकआयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तक्रारीनुसार जिल्हा उपनिबंधक, बुलडाणा यांनी मा.लोकायुक्त यांचेकडे सादर केलेल्या अंतिम अहवालामध्ये नमूद केल्यानुसार तत्कालीन संचालक मंडळावर अद्यापपर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर तक्रार अर्जात एकूण ११ मुद्दे होते, त्यापैकी मा.लोकायुक्त यांनी तीन मुद्दे निकाली काढण्यासाठी दिनांक ०३ जुलै, २०१४ पर्यत मुदत दिली असून याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०२-२०१५) :** (१) होय.
(२) तक्रारीतील मुद्यांच्या अनुषंगाने मुद्देनिहाय कार्यवाही करण्यात आलेली असून सद्यस्थितीमध्ये कार्यवाही सुरु आहे. तसेच संचालक मंडळाचा कार्यकाळ संपुष्टात आलेला असून प्रशासकाची नियुक्ती करण्यात आलेली आहे.
(३) मा.लोकआयुक्त यांचेकडील दि. २५.३.२०१४ च्या सुनावणी दरम्यान पुढील सुनावणीपर्यंत उर्वरित तीन मुद्दे निकाली काढण्याबाबत निर्देश दिले आहेत. परंतु अद्यापपावेतो लोकआयुक्त यांचेकडील पुढील सुनावणी झालेली नाही. तीन मुद्यांपैकी २ मुद्दे पूर्णपणे निकाली निघाले असून बाजार समितीतील अडत्यांच्या दप्तर तपासणीबाबतच्या मुद्यावर कार्यवाही सुरु आहे. सध्या ५०% अडत्यांची दप्तर तपासणी पूर्ण झालेली आहे. बाजार समितीतील नित्याची कामे सांभाळून हे काम केले जात आहे. याबाबतचा अहवाल मा.लोकआयुक्त कार्यालयास वेळोवेळी पाठविला आहे आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोहोळ तालुक्यातील (जि. सोलापूर) मार्ग क्रमांक १४९ मोहोळ- कुरुल कामती मंद्रुप या रस्त्याचे चौपदरीकरण करण्याबाबत**

**(१०) ९५५ (२२-१२-२०१४). श्री. रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रमांसह) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोहोळ तालुक्यातील (जि. सोलापूर) मार्ग क्रमांक १४९ मोहोळ - कुरुल कामती मंद्रुप या ४९ कि.मी. या रस्त्याच्या कामाचे चौपदरीकरण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-०३-२०१५) :** (१) होय.
(२) व (३) सदर रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिली आहे.

---

**निफाड सहकारी साखर कारखाना पिंपळस रामाचे (ता.निफाड, जि.नाशिक) हा कारखाना बॉम्बे एस मोटर्स (इंडिया) कंपनीला सहभागी तत्वावर चालविण्यास देण्याबाबत**

**(११) ९७९ (२२-१२-२०१४). श्री. अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निफाड सहकारी साखर कारखाना पिंपळस रामाचे (ता.निफाड, जि.नाशिक) हा कारखाना बॉम्बे एस मोटर्स (इंडिया) कंपनीला सहभागी तत्वावर चालविण्यास देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कारखाना चालविण्यास देतांना निविदा मागविण्यात आल्या होत्या काय,

(३) असल्यास, किती निविदा शासनास प्राप्त झाल्या व त्यानुषंगाने पुढील कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, बॉम्बे एस मोटर्स (इंडिया) या कंपनीलाच सहभागी तत्वावर कारखाना चालविण्यास देण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०१-२०१५) :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अखत्यारित असलेल्या अनेक शाळा बंद पडल्याबाबत**

**(१२) १०१० (२३-१२-२०१४). श्री. विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अखत्यारित असलेल्या अनेक शाळा बंद असून अशा बंद पडलेल्या शाळांच्या जागेवर असामाजिक तत्वांनी कब्जा केला असून सदर जागेचा दुरुपयोग होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ च्या दुसऱ्या आठवड्यात आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गैरमार्गाने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अखत्यारित असलेल्या शाळांवर कब्जा करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०३-२०१५) :**(१) नाही.

शाळेतील कमी होणा-या पटसंख्येमुळे ६९ शाळा लगतच्या शाळेमध्ये समायोजीत करण्यात आल्या आहेत. बंद शाळांच्या इमारतीचा वापर महानगरपालिकेच्या विविध कार्यालयांसाठी करण्यात येत आहेत तसेच १९ शाळा इमारती खाजगी शैक्षणीक संस्थांना भाडे तत्वावर देण्यात आले आहेत.

(२) नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यावरील पालखेड डावा कालवा आठमाही करण्याबाबत

**(१३) १०२४ (२३-१२-२०१४). श्री. छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यावरील पालखेड डावा कालवा ११० ते १२० किमी व वितरीका क्र. ४६ ते ५२ खरीप कालवा आठमाही करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) सदर कालवा आठमाही करण्याकरिता काही दिवसांपूर्वी शेतक-यांनी रस्ता रोको आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कालवा आठमाही करण्याकरिता शासनाने गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळास प्रस्ताव मागविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०३-२०१५)** :(१) होय.
(२) होय.
(३) नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर येथे अवैध बेकायदा बॉक्साईट उत्खनन करणा-या हिंडाल्को खाणीचे सर्वेक्षण केल्याबाबत

**(१४) १०८० (२२-१२-२०१४). श्री. राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ. सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री. उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथे अवैध बेकायदा बॉक्साईट उत्खनन करणा-या हिंडाल्को खाणीचे बॉक्साईट उत्खनन समितीतर्फे दिनांक ११ फेब्रुवारी, २०१४ रोजीच्या सुमारास सर्वेक्षण करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्वेक्षण पाहणीत काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, या पाहणीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, या अहवालानुसार या कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. प्रकाश मेहता (०५-०३-२०१५) :** (१) प्रस्तुत विषयी जिल्हास्तरीय समिती गठीत करुन दि.११.०२.२०१४ रोजी पहाणी करण्यात आली होती.

(२) सदर पहाणीत मे. हिंडाल्को इंडस्ट्रीज लिमिटेड दुर्गमानवाडी, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर येथील शासनाने मंजूर केलेला बॉक्साईट खनिजाचा खाणपट्टा अभयारण्य तथा राष्ट्रीय उद्यानास लागून असल्याचे निदर्शनास आले.

(३) व (४) या संदर्भात जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी सदर बाब महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व मुख्य वनसंरक्षक, कोल्हापूर यांच्या निदर्शनास आणून याबाबत केंद्रीय वन पर्यावरण विभागाचे स्पष्ट आदेश प्राप्त करुन पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

---

**उदगिरी (जि.कोल्हापूर) येथील बॉक्साईट खाणींवर**
**महसूल विभागाच्या पथकाने टाकलेला छापा**

**(१५) १०८२ (२२-१२-२०१४). श्री. राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ. सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री. उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगिरी (जि.कोल्हापूर) येथील बॉक्साईट खाणींवर महसूल विभागाच्या पथकाने दिनांक १ जानेवारी, २०१४ रोजी वा त्या सुमारास छापा टाकला हे खरे आहे काय?

(२) असल्यास, या छाप्यात कोणता माल हस्तगत करण्यात आला व किती जणांना अटक करण्यात आली आहे?

(३) असल्यास, त्यांचेवर कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात आली वा येत आहे?

(४) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. प्रकाश मेहता (०५-०३-२०१५) :** (१) होय.

(२) सदर कारवाई मध्ये एकूण ४ ट्रक्समध्ये अवैध बॉक्साईट खनिजाची वाहतूक करतांना आढळून आले याप्रकरणी एकूण ६ व्यक्तिंना अटक करण्यात आली आहे.

(३) सदर व्यक्तिंवर भा.दं.वि.कलम ३७९, ३४ व मोटार वाहन कायदा कलम ११४, १७७ अन्वये गुन्हा नोंद क्रमांक १/२०१४ शाहूवाडी पोलीस स्टेशन येथे दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुत गुन्हयाचे दोषारोप पत्र न्यायालयात सादर केले असून त्याचा आर.सी.सी.क्रमांक ५७/२०१४ असा आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भातकुली तालुक्यातील पेढी प्रकल्प पूर्ण करण्याबाबत

**(१६) ११२७ (२४-१२-२०१४). श्री. रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भातकुली तालुक्यातील पेढी प्रकल्प निधी अभावी रखडलेला असून शेतक-यांचे नुकसान होत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भातुकली (जि.अमरावती) पेढी प्रकल्प शेतक-यांचे सोयीने पूर्ण करणेसाठी व संबंधित बाधित शेतक-यांना केंद्र सरकारच्या कायद्याप्रमाणे ४ पट भाववाढ देण्यासाठी तसेच बाधित गावाचे पुर्नवसन व शेतकरी कुटुंबातील एकाला शासकीय नोकरीवर घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०३-२०१५) :**(१) सन २०१४-१५ मध्ये या प्रकल्पावर शासनाने रु.८५ कोटी निधीची तरतूद केलेली आहे.

(२) निम्न पेढी प्रकल्प २०१७-१८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तथापि भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापनाबाबत परदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ या नविन भुसंपदान कायद्यानुसार शेतक-यांना लाभ देता येईल. क्षेत्रित स्तराव पुनर्वसनाचा समयबध्द कार्यक्रम तयार करण्यात आला असून पुनर्वसन कार्यवाही जून, २०१६ पर्यंत करण्याचे नियोजन आहे.

शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही १०१४/१००४/प्र.क्र.३०/९४/१६ अ, दिनांक १७/११/१९९४ अन्वये प्रकल्पग्रस्तांकरीता शासकीय नोकरीत आरक्षण लागू करण्याबाबत तरतूदी करण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सासवड रस्ता (मंतरवाडी) ते खडीमशीन चौक (जि.पुणे) या कात्रज बाह्यवळण मार्गाच्या दुरुस्तीबाबत

**(१७) ११६८ (२२-१२-२०१४). श्री. योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सासवड रस्ता (मंतरवाडी) ते खडीमशीन चौक(जि.पुणे) या कात्रज बाह्यवळण मार्गाला खड्डे पडून वाहतूक कोंडी जीवघेण्या अपघातांची संख्या वाढल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने लवकरात लवकर रस्ता दुरुस्त करावा अशी मागणी तेथील नागरिकांनी माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बाह्यवळण मार्गावर मोठ्या प्रमाणात जड वाहतूक होत असल्याने रस्त्याला अनेक ठिकाणी खड्डे पडले आहेत, हांडेवाडी फाट्यावर रस्ता खचलेला आहे, त्यामुळे अपघात होऊन दुचाकीस्वारांना जीव गमवावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व

तदनुसार शासनाने उक्त रस्ता दुरुस्तीकरीता कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०३-२०१५) :**(१) प्रश्नाधीन रस्तावरील खड्डे भरण्याचे काम त्वरीत करण्याबाबत दि. ३.११.२०१४ रोजी एक निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) हे खरे नाही.

प्रश्नाधीन रस्तावरील खड्डे भरण्याचे काम डिसेंबर, २०१४ अखेर पूर्ण करुन रस्ता सुस्थितीत ठेवण्यात आला आहे. हांडेवाडी फाटयावर रस्ता खचलेला नसून १.०० कि.मी. लांबीत चढ सुधारणेचे काम प्रगतीपथावर आहे, परंतु त्या ठिकाणी अपघात न होण्याची दक्षता घेण्यात येत आहे. रस्त्यावर झालेले अपघात रस्तावरील खड्यांमुळे झालेले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**स्पेशल टाऊनशिप पॉलिसी, क्लस्टर रिडेव्हलपमेंट आणि झोपडपट्टी पुर्नवसन योजना असूनही मुंबईकर झोपडपट्टीत राहत असल्याबाबत**

**(१८) १२०५ (२३-१२-२०१४). ॲड. आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) स्पेशल टाऊनशिप पॉलिसी, क्लस्टर रिडेव्हलपमेंट आणि झोपडपट्टी पुनर्वसन योजना असे अनेक प्रकल्प शासनाने सुरु केले असले तरीही अजून ६२ लाख मुंबईकर झोपडपट्टीत राहत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये प्रजा फाउंडेशन या संस्थेने निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अफोर्डेबल हाउसिंग (सवलतीच्या दरात घरे) या महत्वपूर्ण समस्येचा सामना मुंबईकराना करावा लागतो आणि ही शहरातील गुंतागुंतीची आणि सर्वाधिक आव्हानात्मक समस्या असल्यामुळे झोपडपट्टीत राहणा-या नागरिकांना आपले हक्काचे घर मिळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०७-०३-२०१५) :** (१) प्रजा फाऊंडेशन या संस्थेचा असा विशिष्ट सर्वेक्षण अथवा तपासणी अहवाल नोव्हेंबर, २०१४ मध्ये व त्यानंतर शासनास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(२) व (३) शासनाच्या सुधारीत धोरणानुसार दिनांक १.१.२००० वा त्या पूर्वीच्या झोपडीमध्ये प्रत्यक्ष वास्तव्य करणा-या झोपडीवासियांचा निवारा संरक्षीत करण्यात आला आहे. झोपडपटटी पुनर्वसन योजनेच्या माध्यमातून पात्र लाभार्थ्यांना पर्यायी घर देण्यात येते.

---

## राज्यात गृहनिर्माण कायदा प्रभाविरित्या लागू करण्याबाबत

**(१९) १२११ (२३-१२-२०१४). ॲड. आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्वसामान्य नागरिकांना बोगस जाहिराती आणि फसव्या बिल्डरापासून संरक्षण मिळण्यासाठी गृहनिर्माण कायदा तयार केला असून या कायद्याला राष्ट्रपतींची मंजूरी मिळूनही हा कायदा लागू करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑगस्ट, २०१२ मध्ये या कायद्याचे विधेयक मंजूर होऊनही अजूनपर्यंत हा कायदा राज्यात लागू न होण्यामागील कारणे काय आहेत,

(३) तसेच हा कायदा सर्व सामान्य नागरिकांना फसव्या विकासकांकडून संरक्षण मिळण्यासाठी त्वरित लागू करण्यासाठी कोणती उपाययोजना केली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०९-०३-२०१५) :** (१) (२) (३) व (४)

महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन व विकास) अधिनियम २०१२ ला दिनांक १७/०२/२०१४ रोजी मा. राष्ट्रपती महोदयांची सहमती मिळाल्यानंतर सदर अधिनियम दिनांक २४/०२/२०१४ रोजी राजपत्रात प्रसिध्द करण्यात आला आहे. या अधिनियमातील कलम १,१८,१९,२१,२२,२३,३६,५१ व ५२ च्या तरतुदी दिनांक ०८ जुलै, २०१४ च्या अधिसूचनेअन्वये लागू करण्यात आल्या आहेत. या अधिनियमान्वये महाराष्ट्र गृहनिर्माण नियामक प्राधिकरण व महाराष्ट्र गृहनिर्माण अपिलीय न्यायाधिकरण यांची स्थापना करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## मळगाव (ता.भडगांव, जि.जळगांव) येथील गिरणा धरणातून तितूर नदीसाठी पाण्याचे आरक्षण करण्याबाबत.

**(२०) १३५५ (२३-१२-२०१४). श्री. किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मळगाव (ता.भडगांव, जि.जळगांव) येथील गिरणा धरणातून तितूर नदीसाठी पाण्याचे आरक्षण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकरीता मळगांवाहून पाटचारीची व्यवस्था करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, याकरीता शासनाने निधीची तरतूद केली आहे काय,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. गिरीष महाजन (१२-०३-२०१५) :** (१) गिरणा प्रकल्पाच्या सन १९६९ च्या प्रकल्प अहवालानुसार तितुर बंधा-यावरील खरीप हंगामासाठी ३०० दलघफु ची तरतूद केली आहे.

(२) गिरणा धरणाच्या मुळ प्रकल्प अहवाला नुसार मळगांव चारीची तरतूद नव्ती. तथापि वाढ विस्तार योजने अंतर्गत मळगांव चारी काढण्यात येत आहे.

(३) वाढ विस्तार व सुधारणा कार्यक्रमा अंतर्गत मार्च २०१४ पर्यंत रु.४४३.०० लक्ष निधी वितरित करण्यात आल असून सन २०१४-१५ वर्षाकरीता रु.४.६६ लक्ष इतकी निधीची तरतूद केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालाड पूर्व भागातील आप्पापाडा येथे चाळीच्या ठिकाणी अनेक मजली इमारती बांधण्याकरिता या जमिनीवरील ना विकास पट्याचे(नो डेव्हलमेंट झोन) चे आरक्षण हटविण्याबाबत**

**(२१) १४१९ (२३-१२-२०१४). श्री. सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या पी/उत्तर विभागातील मालाड पूर्व भागातील आप्पापाडा येथील सर्व्हे नं.२२४, हिस्सा १, नभूक्र.६७ या सुमारे १७७८७ चौ.वार (१४८७२.०७) चौ. मी. म्हणजे ३ एकर २७ गुंठे व उक्त विभागातील आप्पापाडा येथील सर्व्हे नं.२२५, न.भू.क्र.६४(१) व सर्व्हे नं. २३९ न.भू.क्र. ६०६१,६२ आणि ७० या जमिनींवरील चाळींच्या ठिकाणी अनेक मजली इमारती बांधण्याकरिता या जमिनीवरील ना विकास पट्याचे(नो डेव्हलमेंट झोन) चे आरक्षण हटविण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांना माहे नोव्हेंबर, २०१४ च्या सुमारास निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार या संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे काय,
(३) असल्यास, या निर्णयाचे स्वरुप काय आहे, त्यांची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०३-२०१५) :**(१) होय.
(२) व (३) यासंदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिका व क्षेत्रिय कार्यालयाकडून अहवाल मागविणेत आलेले आहेत. ते प्राप्त झालेनंतर या प्रकरणी गुणवत्तेनुसार पुढील कार्यवाही संकल्पित आहे.

---

**पशु वैद्यकीय दवाखान्यामध्ये जनावरांच्या शरीरामध्ये असणारे रोग तसेच प्रसुती निदान करण्यासाठी उपयुक्त असणारे सोनोग्राफी यंत्र उपलब्ध नसल्याबाबत**

**(२२) १५१५ (२७-०१-२०१५). श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दुध उत्पादन वाढीसाठी व पशुसंवर्धन करणेसाठी प्रत्येक तालुक्यामध्ये गरजेनुसार पशु वैद्यकीय दवाखाना सुसज्ज इमारतीसह सुरू केलेले आहेत, हे खरे आहे का,
(२) असल्यास, सदर दवाखान्यामध्ये जनावरांच्या शरीरामध्ये असणारे रोग तसेच प्रसुती निदान करण्यासाठी उपयुक्त असणारे सोनोग्राफी यंत्र उपलब्ध नाही, हे ही खरे आहे का,
(३) असल्यास, दुध उत्पादकांना सदर सोय उपलब्ध करण्यासाठी जिल्ह्यातील अथवा सहकारी खाजगी दुध संघाच्या सोनोग्राफी यंत्राचा वापर करावा लागतो हे खरे आहे का,
(४) असल्यास, वेळेत निदान व उपचार न झाल्यामुळे अनेक जनावरे दगावल्याच्या तक्रारी

शासनाकडे आल्या आहेत, हे खरे आहे का,
(५) असल्यास, पशुधन वाचविण्यासाठी शासन तालुक्यातील पशु वैद्यकीय दवाखान्यामध्ये सोनोग्राफी मशीन उपलब्ध करणेविषयी निर्णय येणार आहे का?

**श्री. एकनाथराव खडसे (२८-०१-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही, राज्यातील १४८ पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालयांमध्ये सोनोग्राफी मशीनद्वारे जनावरांच्या शरीरातील अवयवांची तपासणी करण्याच्या सुविधा उपलब्ध आहेत.
(३) हे खरे नाही, प्रत्येक जिल्ह्यातील काही तालुक्यांच्या ठिकाणी सोनोग्राफी मशीनद्वारे तपासणी करण्याच्या सुविधा उपलब्ध आहेत.
(४) हे खरे नाही, अशा प्रकारची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(५) राज्यातील उर्वरीत तालुक्यांचे ठिकाणी सोनोग्राफी मशीनद्वारे तपासणी करण्याच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

---

## पांढरेपाणी ते विशाळगड (ता.शाहूवाडी जि.कोल्हापूर) या रस्त्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरण करुन दुरुस्ती करण्याबाबत

**(२३) १५१८ (२३-१२-२०१४). श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पांढरेपाणी ते विशाळगड( ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर ) हा रस्ता पूर्वी जिल्हा परिषदकडे होता व कासारी (गेळवडे) धरणाच्या बांधकामावेळी या रस्त्याचे हस्तांतरण पाटबंधारे विभागाकडे केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धरणाचे काम पूर्ण होऊन अनेक वर्षे झालेमुळे पाटबंधारे विभागाने या रस्त्याच्या दुरुस्तीकडे पुर्णपणे दूर्लक्ष केलेले आहे व त्यामुळे हा रस्ता पुर्णपणे नादुरुस्त झालेला आहे, हे ही खरे आहे का,
(३) असल्यास, सदर रस्त्याचे पाटबंधारे विभागाकडून जिल्हा परिषद अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरण करुन रस्ता दुरुस्त करण्याविषयी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०२-२०१५) :**(१) होय.
(२) नाही.
(३) कासारी मध्यम प्रकल्प हा पूर्ण झाला असून सदर रस्त्याचे जलसंपदा विभागाकडून मजबूतीकरण / दुरुस्ती करणे संयुक्तिक नसल्यामुळे सदर रस्त्याचे जिल्हा परिषदेकडे हस्तांतर करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य परिवहन महामंडळाने (एस.टी.) शासनाकडे**
**टोल माफीकरिता केलेल्या मागणीबाबत**

**(२४) १५२९ (२२-१२-२०१४). श्री. संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाने (एस.टी) ५ ते ७ वर्षापूर्वी राज्य शासनाकडे टोल माफीची मागणी केली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास सध्या अंदाजे वर्षाकाठी १४० कोटीचा टोल एस.टी शासनास अदा करते हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार शासनाद्वारे चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने टोल माफीबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (११-०३-२०१५) :**(१) व (२) हे खरे आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने सन २०१३-१४ मध्ये रु.१३२.९९ कोटी इतका टोल भरलेला आहे.

(३) व (४) शासन दि. ५.१०.२०१० नुसार महामंडळाच्या प्रवासी कर, पथकराच्या संदर्भात आढावा घेण्यासाठी शासन स्तरावर समिती गठीत केली आहे. समितीने शेजारील राज्यातील प्रवासी कर. पथकर, मोटार वाहन कर यांचा आढावा घेतला आहे. तसेच दि. १ जुलै, २०१४ पासून शासनाने राज्यातील एकूण ४४ पथकर नाके बंद केले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पोलिसांना बॉम्बसूट पुरवण्याच्या कामात शासनाची कोट्यवधी**
**रुपयांची फसवणूक करण्यात आल्याबाबत**

**(२५) १५३१ (२२-१२-२०१४). श्री. संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलिसांना बॉम्बसुट पुरवण्याच्या कामात शासनाची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणारा पुरवठादार व त्याच्या कंपनीला गृह विभागाने कायम स्वरुपी काळ्या यादीत टाकले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने आर्थिक नुकसान भरुन काढण्याबाबत पुरवठादारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, कारवाईस होणाऱ्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०२-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) पोलीस महासंचालक कार्यालयाकडून शासनास पाठविलेल्या प्रस्तावास अनुसरुन शासनाने चौकशी अधिका-याची नेमणूक करुन प्रकरणाची चौकशी केलेली आहे. चौकशीचे वेळी शासनास उक्त निविदाकारांनी बॉम्बसूट प्रकरणी महाराष्ट्र पोलीसांची फसवणूक केली असल्याचे निष्पन्न झाल्याने शासनाने उक्त कंपनीस काळ्या यादीत टाकले आहे.
(४) श्री.बिमल अगरवाल यांच्या मालकीची कंपनी मे.टेक्नोट्रेड इंपेक्स प्रा.लि. मुंबई यांनी बॉम्बसूटचा पुरवठा केलेला नसून देखील त्यांना रु. ६.२१ कोटी इतकी रक्कम अदा करण्यात आलेली आहे. प्रस्तुत प्रकरणात बॉम्बसूटचा पुरवठा झालेला नसताना मे.टेक्नोट्रेड इंपेक्सला रक्कम अदा झालेली आहे. त्यामुळे या कंपनीचे श्री.बिमल अगरवाल यांच्या मे.पंचरत्न प्लास्टीक व मे.जेमिनी एंटरप्रायजेस या बेनामी कंपन्या असल्याने या दोन्ही कंपन्याया देय असलेली रु. ७,०२,४८,१५० /- रक्कम रोखून ठेवण्यात यावी, असा निर्णय झाला आहे.

सदर प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी करण्यात आली आहे. सदर अहवालाच्या आधारे कुलाबा पोलीस ठाणे (मुंबई शहर) येथे गु.र.क्र. २१ /२०१२, भा.दं.वि. ४२०, ४०६, ४६९, ४११, ४१८, १२०- B अन्वये मेसर्स टेक्नोट्रेड इंपेक्स इंडिया प्रा.लि. यांचे संचालक व इतर २ जण यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला असून आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांचेकडून सदर प्रकरणी तपास चालू आहे.

उपरोक्त गुन्ह्यामध्ये कंपनीचे संचालक बिमल अगरवाल यांना अटक पूर्व जामीन मंजूर करताना मा. Metropolitan Magistrate, १९ th Court Esplande, Mumbai यांनी दिनांक २७.०८.२०१२ च्या आदेशान्वये आरोपीतांना रु. ७.०० कोटी किंमतीची बँक गॅरंटी जमा करण्याबाबत निर्देश दिले. त्यास अनुसरुन आरोपी बिमल अगरवाल यांनी रु. ७.०० कोटी रकमेची बँक गॅरंटी आर्थिक गुन्हे शाखा यांचेकडे जमा केली असून ती वेळोवेळी पुर्नजिवीत करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोर्ट फी स्टॅम्प आणि स्टॅम्प पेपरच्या असलेला तुटवडा लक्षात घेवून मुंबईतील अनेक ठिकाणची बंद झालेली विक्री केंद्र पुन्हा सुरु करण्याबाबत

**(२६) १५३४ (२७-०१-२०१५). श्री. संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोर्ट फी स्टॅम्प आणि स्टॅम्प पेपरच्या असलेला तुटवडा लक्षात घेवून मुंबईतील अनेक ठिकाणची बंद झालेली विक्री केंद्र पुन्हा सुरु करा असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने शासनाला माहे ऑक्टोबर, २०१४ दरम्यान दिले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने उक्त घटनेची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, कार्यवाहीस होणा-या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (११-०२-२०१५) :**(१) होय.

(२) होय.

(३) मा.उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार मुंबई व उपनगरे येथे न्यायालयाच्या आवारात शासकीय मुद्रांक विक्री काऊटर्स सुरु करण्यात आली आहेत व अधिकृत वकील संघटना यांना न्यायालयाच्या आवारात मुद्रांक विक्रीचा तात्पुरता परवाना देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत  नाही.

---

**अन्न व नागरी पुरवठा विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत.**

**(२७) १५३९ (१५-०१-२०१५). श्री. संजय सावकारे (भुसावळ), श्री. उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्न व नागरी पुरवठा विभागातील रेशनिंग विभागात पुरेसे कर्मचारी नेमण्यासाठी राज्य लोकसेवा आयोगाने सन १९९८ ते सन २००६ पर्यंत परिक्षाच घेतली नसल्याचे शासनाच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयात माहे नोव्हेंबर, २०१४ च्या दरम्यान एका सुनावणीवेळी सांगितले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गिरीश बापट (१०-०२-२०१५) :** (१) होय.

(२) नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांच्याकडून पाठविण्यात आलेल्या मागणी पत्रानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सन २००८ ते २०११ या कालावधीत लिपिक - टंकलेखक संवर्गातील १३४ उमेदवार, सन २०१२ मध्ये २५८ उमेदवार, सन २०१३ मध्ये २५ उमेदवार व सन २०१४ मध्ये १८७ उमेदवार उपलब्ध करुन दिले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत  नाही.

---

**राज्यातील अंगणवाडयांसाठी निश्चित अभ्यासक्रम तयार करण्यात आला असून त्याला अद्‌यापी शासनाची मंजुरी मिळालेली नसल्याबाबत**

**(२८) १५४२ (२२-१२-२०१४). श्री. संजय सावकारे (भुसावळ), श्री. बळीराम सिरसकर (बाळापूर), श्री. हनुमंत डोळस (माळशिरस), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडयांसाठी निश्चित अभ्यासक्रम तयार करण्यात आला असून त्याला अद्यापी शासनाची मंजुरी मिळालेली नसल्याची बाब माहे नोव्हेबर, २०१४ रोजीच्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,
(३) असल्सास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने सदर अभ्यासक्रम लागू करण्याबाबत शासनाकडून काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) अद्यापी, कार्यवाही केली नसल्यास होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०३-२०१५) :**(१) सदर योजना केंद्र पुरस्कृत असून अंगणवाडीतील ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांसाठी पूर्वशालेय शिक्षण अभ्यासक्रम निश्चित करण्याची कार्यवाही केंद्र शासन स्तरावर सुरु आहे. सद्यःस्थितीत जुनाच अभ्यासक्रम लागू आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे, पालघर आणि रायगड जिल्हयासाठींच्या ठाण्यातील एकमेव औद्योगिक न्यायालयात न्यायाधिशांसह अपुरा कर्मचारीवर्ग असल्याबाबत**

**(२९) १५५१ (१५-०१-२०१५). श्री. संजय सावकारे (भुसावळ), श्री. उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे, पालघर आणि रायगड जिल्हयासाठींच्या ठाण्यातील एकमेव औद्योगिक न्यायालयात न्यायाधिशांसह अपुरा कर्मचारीवर्ग असल्याने प्रलंबित दाव्यांची संख्या १८०० झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १२ ते १४ नोव्हेंबर पर्यंत काम बंद करण्याचा इशारा वकिलांनी दिला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने प्रलंबित दावे तातडीने निकाली काढण्याबाबत शासन कोणती उपाययोजना करणार आहे वा केली आहे,
(५) नसल्यास, कार्यवाही होणा-या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही.
ठाणे येथे दोन औद्योगिक न्यायालये कार्यरत असून जानेवारी, २०१५ अखेर प्रलंबित दाव्यांची संख्या १,७५४ इतकी आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.

(४) औद्योगिक न्यायालय, ठाणे येथील न्यायिक अधिका-यांची पदे भरली असून वर्ग ३ मधील लिपिक-टंकलेखक व वर्ग ४ मधील शिपाई या संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत  नाही.

---

**बोर्डी नाला प्रकल्पाची (ता.चांदुरबाजार जि.अमरावती) कामे बंद असल्याबाबत**

**(३०) १५५४ (२४-१२-२०१४). डॉ. सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील बोर्डी नाला प्रकल्पांचे काम मागील ५ वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) प्रकल्प पुर्ती बाबत समयबध्द कार्यक्रम तयार केला आहे काय व प्रकल्प पूर्ण करण्याचा कालावधी कोणता,

(३) या प्रकल्पाद्वारे प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ शेतक-यांना केव्हा उपलब्ध होईल याबाबत नियोजन तयार करण्यात आले आहे काय ?

**श्री. गिरीष महाजन (२५-०२-२०१५) :**(१) होय.
(२) व (३) या प्रकल्पासाठी एकुण ७६२.४३ हे. हयामध्ये वनजमीन १२.७२ हे., शासकीय जमीन २५.८५ हे., खाजगी जमीन ७२३.८६ हे. आहे. पैकी वनजमीन ताब्यात मिळाली आहे व शायकीय जमीनीची हस्तांतरणासाठी कार्यवाही सुरु आहे. आवश्यक जमिनीपैकी सन २००९ ते सन २०१२ पर्यंत एकूण ५५२.३३ हे. जमीन खरेदी करण्यात आली आहे. या व्यतिरिक्त सन २००९ ते सन २०१५ पर्यंत एकुण १०६.०२ हे. जमिनीचे भूसंपादन प्रस्ताव महसूल खात्याकडे सादर करण्यात आले आहेत. सदर प्रस्ताव महसूल खात्याकडे भूसंपादनाच्या विविध प्रक्रियेमध्ये आहेत. दरम्यान भूसंपादन कायद्यामध्ये प्रथम केंद्र शासनाद्वारे व नंतर राज्य शासनाद्वारे बदल करण्यात आला आहे.
निधीच्या उपलब्धतेनुसार प्रकल्पाचे काम २०१७-१८ मध्ये पूर्ण करणे नियोजित आहे.

---

**निम्न पेढी (जि. अमरावती) प्रकल्पांची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(३१) १५५७ (२३-०२-२०१४). डॉ. सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील सिंचनाच्या अनुशेष असलेल्या निम्न पेढी प्रकल्पाचे काम मागील ५ वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) सदर प्रकल्पामुळे बाधीत गावांचे पुनर्वसन करावयाचे गावांबाबत सद्य:स्थिती काय आहे,

(३) या गावांचे पुनर्वसन केव्हा पूर्ण होईल व याबाबत समयबध्द कार्यक्रम निश्चित केला आहे काय,
(४) तसेच या प्रकल्पाचे काम केव्हा पूर्ण करण्यात येईल व शेतकऱ्यांना प्रत्यक्ष सिंचनाची सोय उपलब्ध करुन देण्यात येईल ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०२-२०१५) :**(१) नाही. हे खरे नाही.
(२) या प्रकल्पाकरिता ५ गावांचे पूर्णतः व २ गावांचे अंशतः पुनर्वसन करावयाचे आहे. त्यापैकी २ गावांची नागरी सुविधाची कामे ९० टक्के झाली आहेत व २ गावांच्या नागरी सुविधांची अंदाजपत्रके मंजूरी प्रक्रियेत आहेत. एका गावाच्या जागेचा निवाडा झाला तथापि प्रकल्प यंत्रणेस ताबा अद्याप प्राप्त झालेला नाही.
(३) या गावाचे पुनर्वसन पूर्णत्वाचा समयबध्द कार्यक्रम करण्यात आला असून सन २०१६-१७ मध्ये पुनर्वसनाचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रकल्पाद्वारे सिंचनाचा लाभ सन २०१६-१७ पासून देणे व प्रकल्प सन २०१७-१८ मध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

## अमरावती जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्पाने बाधीत होणाऱ्या गावाचे पुनर्वसनाबाबत

**(३२) १५५८ (२३-१२-२०१४). डॉ. सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील सद्य:स्थिती सुरू असलेल्या सर्व पाटबंधारे प्रकल्पाद्वारे बाधीत होत असलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पूनर्वसनाबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(२) निम्न पेढी, पंढरी, लोअर चारगड या पाटबंधारे प्रकल्पाद्वारे बाधीत गावांचे पूनर्वसनाकरीता पर्यायी जमीन उपलब्ध झालेले असली तरी त्या ठिकाणी पुनर्वसनाची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही, हे खरे आहे काय,
(३) नागरी सुविधांचे कामांबाबत प्रकल्पनिहाय अंदाजपत्रके व मंजूरीची सद्य:स्थिती काय आहे ही कामे कोणत्या स्तरावर प्रलंबित आहे,
(४) पुनर्वसन पूर्ण न झाल्यामुळे सिंचन निर्मिती झाली नाही अशा प्रकल्पाबाबत पूनर्वसनाचा समयबद्ध कार्यक्रम आखण्यात आला आहे काय, असल्यास, त्याची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०२-२०१५) :**(१) अमरावती जिल्ह्यात सद्यःस्थितीत २ मोठे, ५ मध्यम व २८ लघु असे एकूण ३५ प्रकल्प बांधकामाधीन असून त्यापैकी उर्ध्व वर्धा प्रकल्पाचे पुनर्वसन पूर्ण झाले आहे. उर्वरीत ३४ प्रकल्पापैकी १० प्रकल्पामध्ये पुनर्वसन आवश्यक असून सद्यःस्थितीत २ प्रकल्पांचे नविन गावठाण स्थळ निश्चित झाले असून लेआऊट मंजुर आहे. १ प्रकल्पामध्ये लेआऊट मंजूर व्हावयाचे आहे. चांदी नदी मधील प्रकल्पाबाधीत नवीन गावठाणामध्ये स्थलांरीत झाले आहे. ५ प्रकल्पामध्ये नविन गावठाण स्थळ निश्चितीची कार्यवाही सुरु आहे. १ प्रकल्पामध्ये भूसंपादन कार्यवाही सुरु आहे.

(२) निम्न पेढी प्रकल्प व निम्न चारगड प्रकल्पाकरिता करावयाच्या पुनर्वसनासाठी जागा उपलब्ध झाली असून त्यावर पुनर्वसन करावयाची प्रक्रिया सुरु आहे. पंढरी मध्यम प्रकल्पांतर्गत खापरखेडा या गावासाठी मौजे खराड येथे जमीन उपलब्ध करण्यात आली असून त्याठिकाणी सर्व नागरी सुविधा पूर्ण करण्यात आल्या आहेत व भुखंडाचे वाटप पूर्ण झाले आहे. आंतर व बाह्य विद्युतीकरणाचे कामे स्थलांतरासोबत करण्याचे नियोजित आहे.

(३) निम्न पेढी प्रकल्पामध्ये नविन गावठाणामध्ये नागरी सुविधा पुरविण्याचे ५० % काम झाले असून उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहेत. निम्न चारगड व पंढरी प्रकल्पामध्ये नागरी सुविधा पुरिवण्याचे ८० % काम झालेले असून उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहते. पेढी बॅरेज मध्ये लेआऊट मंजुरी व भूखंड वाटप नंतर नागरी सुविधा पुरविण्याचे काम करण्यात येईल. निम्न साखळी प्रकल्पामध्ये मुल्यांकनाचे प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच ४ प्रकल्पामध्ये (चंद्रभागा, राजुरा बॅरेज , वासनी व गर्गा प्रकल्प) नवीन गावठाणाची जागा ताब्यात न मिळाल्यामुळे व अभिन्यास तयार न झाल्यामुळे नागरी सुविधेच्या कामास सुरुवात झालेली नाही. चांदी नंदी प्रकल्पाचे नागरी सुविधाची कामे पूर्ण झालेली असून प्रकल्पग्रस्त स्थलांतरीत झालेले आहे.

(४) पुनर्वसन पूर्ण न झाल्यामुळे सिंचन बाधीत झाले असे प्रकल्प नाहीत. तथापि पुनर्वसन अंतर्भूत असलेली प्रकल्पाची कामे प्रगतीपथावर असून पुनर्वसनाचा प्रकल्पनिहाय समयबध्द कार्यक्रम आखण्यात आला आहे.

---

## अमरावती महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सोयी सुविधा निधी अंतर्गत करण्यात आलेल्या कामांची गुणवत्ता पडताळणी करण्याबाबत

**(३३) १५६७ (२३-१२-२०१४). डॉ. सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सोयी सुविधा निधी अंतर्गत करण्यात आलेल्या कामांची गुणवत्ता पडताळणी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, अमरावती दिनांक ७ नोव्हेंबर,२०१४ रोजी पत्र दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने गुणवत्ता पडताळणी करण्यात आली आहे काय वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०३-२०१५) :**(१) होय,

(२) अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग दक्षता व गुणनियंत्रण मंडळ अमरावती यांच्याकडे गुणवत्ता पडताळणी करण्याबाबतचा प्रस्ताव मनपा अमरावतीने सादर केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती महानगरपालिकेद्वारे खरेदी करण्यात आलेल्या फायबर लेडीज टॉयलेट मधील गैरव्यवहाराबाबत

**(३४) १५६८ (२३-१२-२०१४). डॉ. सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती महानगरपालिकेद्वारे खरेदी करण्यात आलेल्या फायबर लेडीज टॉयलेट प्रकरणात गैरव्यवहार झाला असून त्याची चौकशी करण्याची तक्रार दिनांक २७ जून, २०१३ रोजी जनविकास कॉंग्रेस पक्षांच्या महिला प्रतिनिधी यांनी मा.आयुक्त महानगरपालिका यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) सदर चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०३-२०१५) :** (१) होय,

(२) होय.

(३) प्राप्त झालेलया तक्रारीनुसार उपायुक्त यांच्या मार्फत सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली असुन चौकशीअंती खरेदी प्रक्रियेत कोणतीही अनयिमितता न झाल्याचे निदर्शनास आले.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोळसा आणि गॅसच्या पुरवठ्यातील तुटीमुळे महावितरणाला कमी वीज मिळत असल्याबाबत

**(३५) १६११ (२७-०१-२०१५). डॉ. बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री. अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरणाला कोळसा आणि गॅसच्या पुरवठ्यातील तुटीमुळे गेल्या तीन महिन्यापासून दररोज सुमारे दोन हजार मेगावॅट वीज कमी मिळत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सर्वच भागात दररोज तीन ते चार तासांचे लोडशेडिंग सुरू झाले आहे,कोळशाच्या उपलब्धतेबाबत केंद्राकडून कोणतीही मदत न मिळाल्याने ही स्थिती उद्भवत आहे, हे ही खरे आहे काय,

(३), असल्यास, या परिस्थितीवर मात करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या करण्यात येत आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०२-२०१५) :**(१) व (२) अंशतः खरे आहे. रत्नागिरी गॅस पॉवर कंपीनी व महानिर्मिती कंपनीचा उरण प्रकल्प गॅसवर आधारीत वीज निर्मिती प्रकल्प असून सदर प्रकल्पास रिलायन्स केजी डी-६ बेसीन व गेल कडून गॅस पुरवठा होतो. सध्या केजी डी-६

मधून होणार गॅस पुरवठा पूर्णपणे बंद असून गेल कडून मिळणा-या गॅसच्या पुरवठ्यावर उरण प्रकल्पांमधून ४२० मे.वॅ. वीज निर्मिती होत आहे. सध्या रत्नागिरी प्रकल्पाकडून महावितरण कंपनीस मिळणारा वीज पुरवठा पूर्णपणे बंद असून कराराप्रमाणे परवडणा-या किंमतीवर रिलायन्स केजी डी- ६ बेसीन मधून गॅस पुरवठा करणे संबंधात मा.मुख्यमंत्री यांच्या स्तरावरुन मा.पंतप्रधान, मा.मंत्री (उर्जा) केंद्र सरकार यांना विनंती करण्यात आली आहे. तथापि कोळश्याच्या अनुउपलब्धतेमुळे नोव्हेंबर, २०१४ पर्यत आवश्यकतेनुसार पॉवर एक्सचेंज मधून साधारणतः ३०० ते ५०० मे.वॅ.वीज खरेदी करण्यात आली असून राज्यात भारनियमन नाही. परंतु फक्त अधिक वितरण हानी व कमी वीज वसूली असलेल्या वाहिन्यावर आवश्यकतेनुसार ५० ते ५०० मे.वॅ.भारनियमन करण्यात येत आहे.

(३) कोळसा संकट निवारण करण्यासाठी मा.मुख्यमंत्री व मा.राज्यमंत्री (ऊर्जा), केंद्रसरकार यांची बैठक आयोजित करण्यात आली होती तसेच इंधन तुटवडा समस्येचे निराकरणास्तव केंद्रशासनाचा सहभाग महत्वाचा असल्याचे मा.पंतप्रधान यांना मा.मुख्यमंत्री यांच्या स्तरावरुन दि. ३.०९.२०१४ अन्वये कळविण्यात आले आहे.

---

**मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत शेतक-यांसाठी हप्ता (रुमाल) पध्दतीचा वापर सुरु असल्याबाबत**

**(३६) १६१६ (२२-१२-२०१४). डॉ. बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री. विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत शेतक-यांसाठी हप्ता (रुमाल) पध्दतीचा पावर करुन नये असा नियम असतांना ही पध्दत उपयोगात आणली जात असल्याचे दिनांक १९ सप्टेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०२-२०१५) :**(१) होय, अंशतः खरे आहे.

(२) होय, चौकशी चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मराठी भाषेच्या विकासाच्या संदर्भात नेमलेल्या समितीच्या अहवालाबाबत**

**(३७) १६१७ (२२-१२-२०१४). डॉ. बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री. विजय औटी (पारनेर), श्री. अजय चौधरी (शिवडी), श्री. सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने नियुक्त केलेल्या भाषा सल्लागार समितीने मराठी भाषेच्या विकासाच्या संदर्भात आपला अहवाल शासनास माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान सादर केला असून उक्त अहवालात सदर समितीने अहवालात कोणकोणत्या शिफारशी केल्या आहेत,
(२) तसेच सदर शिफारशींवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०३-०२-२०१५) :** (१) भाषा सल्लागार समितीने "महाराष्ट्र राज्याचे पुढील २५ वर्षासाठीचे मराठी भाषाविषयक धोरण-२०१४" चा मसुदा अहवाल दि.१९/८/२०१४ रोजी शासनास सादर केला आहे. या अहवालामध्ये समितीने शिक्षण, उच्च माध्यमिक शिक्षण, उच्च शिक्षण, न्यायालयातील कामकाजात मराठीचा वापर, प्रशासन, वित्तीय संस्था, उद्योगजगत, प्रसारमाध्यमे, नव तंत्रज्ञानात मराठीचा वापर, इ. महत्त्वाच्या बाबीसंदर्भात शिफारशी केल्या आहेत.
(२) सदरहू मसुदा शासनाच्या संकेतस्थळावर दि.५/११/२०१४ रोजी उपलब्ध करण्यात आली असून त्याव मंत्रालयीन सर्व विभाग, शासकीय/निमशासकीय/खाजगी कार्यालये, संस्था, मंडळे/महामंडळे, विद्यापीठे, महविद्यालये, विद्यालये तसेच साहित्यिक, मराठी भाषा तज्ञ व जनता इत्यादीकडून या धोरणाविषयी सूचना, सुधारणा, हरकती असल्यास याबाबत मराठी भाषा विभागास दि.२५/२/२०१५ पर्यंत पाठविण्याबाबत आवाहन केलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात कृषी व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँका म्हणून अस्तित्वात आलेल्या भूविकास बँकाना आपल्या नावात बँक हा शब्द वापरता येणार नसल्याबाबत**

**(३८) १६२० (२२-१२-२०१४). डॉ. बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री. विजय औटी (पारनेर), श्री. अजय चौधरी (शिवडी), श्री. सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कृषी व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बॅका म्हणून अस्तित्वात आलेल्या भूविकास बँकाना बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ लागूच होत नसल्याचा निष्कर्ष भूविकास बँक समितीने आपल्या अहवालात ठळकपणे मांडला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे भूविकास बँकांना आपल्या नावात बँक हा शब्द वापरता येणार नाही असेही नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने तपासणी करुन कोणता निर्णय घेतला आहे,
(४) अद्यापही या संदर्भात निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०२-२०१५) :**(१) व (२) जिल्हा बँक व शिखर बँक यांच्यातील येणे देणे निश्चती करण्यासाठी श्री. चौगुले विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लेखापरिक्षण, कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखाली दि.०३.०२.२०१४ रोजी नेमलेल्या समितीने राज्यात कृषि व ग्रामिण बहुउद्देशीय विकास बँका म्हणून अस्तित्वात आलेल्या भूविकास बँकांना रेग्लुलेशन ॲक्ट १९४९ लागू होत नसल्याचा निष्कर्ष नमुद केला आहे. हे खरे आहे.
(३) भूविकास बँकांना बँकिग रेल्गुलेशन ॲक्ट १९४९ लागूच होत नसल्याचा श्री. चौगुले समितीने काढलेला निष्कर्ष, भारतीय रिझर्व बॅकेच्या धोरणानुसार परवाना प्राप्त बॅकेस मार्च, २०१४ अखरे ७% CRAR असणे बंधनकारक आहे. तसेच बँकींग परवाना प्राप्त करण्यासाठी आवश्यक असणा-या निकषांची पुर्तता बँक करत नसणे या कारणामुळे भुविकास बॅकेच्या नावात बँक वापरण्यासंदर्भात शासनाकडून तपासणी करणे अथवा त्यासंदर्भात निर्णय घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### अंबरनाथ (जि.ठाणे) येथे अद्यापही स्वतंत्र कृषी विभागाचे कार्यालय नसल्याबाबत

**(३९) १६३८ (२२-१२-२०१४). डॉ. बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबरनाथ (जि.ठाणे) तालुका स्थापन होऊन १४ वर्षे झाली असूनही अंबरनाथ तालुक्याला अद्यापही स्वतंत्र कृषी विभागाचे कार्यालय मिळालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंबरनाथ तालुक्यात ३३ हजार हेक्टर शेती असून, त्यापैकी ५००० हेक्टर क्षेत्रावर भात शेतीची लागवड केली जात असून १२५ एकर मध्ये भाजीपाल्याचे व ६५ हेक्टर मध्ये हरभऱ्याचे उत्पादन घेतले जात असणे असे असताना अंबरनाथ मध्ये कृषी कार्यालय नाही हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत स्थानिक शेतकऱ्यांकडून वांरवार प्रशासनाकडे मागणी करण्यात येत असल्याने शासनाने आतापर्यंत काय उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०२-२०१५) :**(१), (२), (३) व (४) कृषि विभागाची पुर्नरचना दि.१.७.१९९८ पासुन करण्यात आली आहे. त्यामध्ये तालुका कृषी अधिकारी, उल्हासनगर हे कार्यालय कार्यान्वित झालेले होते. शासनाने दि.२२.५.२००९ च्या सुधारित आकृतीबंधानुसार अंबरनाथ तालुक्यासाठी तालुका कृषी अधिकारी, अंबरनाथ असे मुख्यालय निर्माण करण्यात मान्यता देण्यात आलेली आहे. पुर्वीचे उल्हासनगर कृषी कार्यालांतर्गत अंबरनाथ तालुक्यातील क्षेत्राचा समावेश होता व सदर कार्यालयातून सुरळितपणे केले जात आहे. प्रत्यक्षात उल्हासनगर कार्यालयाचे स्थलंतर झालेले नाही. तथापि, अंबरनाथ क्षेत्रात जागा उपलब्ध करुन घेऊन स्थलांतर करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

---

### राज्यात घर खरेदीत बिल्डरांकडून होणा-या फसवणुकी विरोधात ग्राहकांना दाद मागण्याकरिता स्थापन केलेल्या प्राधिकरणबाबत

**(४०) १६५१ (२३-१२-२०१४). डॉ. सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात घर खरेदीत बिल्डरांकडून होणा-या फसवणुकी विरोधात ग्राहकांना दाद मागता येईल तसेच गृहनिर्माण क्षेत्रात ग्राहकांच्या व्यापक हितासाठी सरकारने माहे डिसेंबर, २०११ अखेर (बुधवार, दिनांक २८ डिसेंबर, २०११) रोजी महाराष्ट्र गृहनिर्माण नियमन आणि विकास प्राधिकरण स्थापन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जानेवारी, २०१३ पर्यंत प्राधिकरणाकडे किती ग्राहकांच्या तक्रारी आल्या आहे,

(३) असल्यास, तक्रारी बाबत किती व कोणत्या बिल्डरांवर कारवाई करण्यात आली व कोणती कारवाई करण्यात आली,

(४) नसल्यास, विलंबाचे कारण काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०९-०३-२०१५) :** (१) (२) (३) व (४) महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन व विकास) अधिनियम २०१२ ला दिनांक १७/०२/२०१४ रोजी मा. राष्ट्रपती महोदयांची सहमती मिळाल्यानंतर सदर अधिनियम दिनांक २४/०२/२०१४ रोजी राजपत्रात प्रसिध्द करण्यात आला आहे. या अधिनियमातील कलम १,१८,१९,२१,२२,२३,३६,५१ व ५२ च्या तरतुदी दिनांक ०८ जुलै, २०१४ च्या अधिसूचनेअन्वये लागू करण्यात आल्या आहेत. या अधिनियमान्वये महाराष्ट्र गृहनिर्माण नियामक प्राधिकरण व महाराष्ट्र गृहनिर्माण अपिलीय न्यायाधिकरण यांची स्थापना करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

### राज्यातील राज्य मानवी हक्क आयोगाच्या अध्यक्षपदासह दोन सदस्यांची पदे गेल्या ११ महिन्यापासून रिक्त असल्याबाबत

**(४१) १६५२ (१५-०१-२०१५). डॉ. सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील राज्य मानवी हक्क आयोगाच्या अध्यक्षपदासह दोन सदस्यांची पदे गेल्या ११ महिन्यापासून रिक्त असल्याने आयोगाचे काम ठप्प असुन आतापर्यंत तब्बल ८ हजार ७२१ तक्रारी प्रलंबित असल्याची माहिती माहे जानेवारी, २०१३ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, आयोगाचे अध्यक्षांनी काही कारणामुळे दिनांक २२ फेब्रुवारी, २०१२ मध्ये अध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्यानंतर अद्यापपर्यंत हे पद रिकामेच आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०२-२०१५) :** (१), (२) व (३) माहे सप्टेंबर, २०१३ पासून आयोगावर अध्यक्ष व १ सदस्य यांची नियुकत केलेली आहे.

---

**राज्यात सार्वजनिक वितरण प्रणालीमार्फत वितरीत करण्यात येणा-या धान्यांचा काळाबाजार रोखण्याबाबत**

**(४२) १६५६ (१५-१-२०१५). डॉ. सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सार्वजनिक वितरण प्रणालीमार्फत वितरीत करण्यात येणा-या धान्यांचा काळाबाजार रोखण्यासाठी शासनाने व्दारपोच योजना सुरु केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वस्त धान्य दुकानदार परस्पर धान्य लाभार्थ्यांना वितरित न करता, खुल्या बाजारात विकून धान्याचा काळाबाजार करीत आहे तसेच शासनाकडून मागणीपेक्षा धान्याचे नियतन कमी प्रमाणात करण्यात येत असल्याने कार्डधारकांना हक्काच्या धान्यापासून वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक, मराठवाडा तसेच खानदेश भागात काही ठिकाणी व्दारपोच योजना सुरू असली तरी विदर्भात मात्र योजना कागदोपत्री सुरू आहे, तसेच शासनाकडून धान्याचे कमी नियतन, यामुळे कार्डधारकांना खुल्या बाजारातून धान्य खरेदी करण्याची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.गिरीश बापट (११-०३-२०१५) :** (१) सुधारित धान्य वितरण पध्दतीनुसार भारतीय अन्न महामंडळ गोदाममममम ते शासकीय गोदाम ते शासकीय गोदाम व शासकीय गोदाम ते रास्तभाव दुकानांपर्यंत एकाच वाहतूकदारा मार्फत थेट वाहतूकीची पध्दती राज्यामध्ये राबविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असून, अहमदनगर, धुळे, नंदूरबार, बीड व अमरावती या ५ जिल्हयांमध्ये ही योजना कार्यान्वीत करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही. सुधारित धान्य वितरण पध्दतीनुसार अन्नधान्याची वाहतूक सर्व जिल्हयांमध्ये कार्यान्वित झाली नसली तरी, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमानुसार प्रत्येक जिल्हयातील रास्त भाव दुकानांना नियतनानुसार अन्न धान्याचा पुरवठा पूर्वीच्या वाहतूकीच्या कार्यपध्दतीनुसार नियिमतपणे सुरु आहे.

(३) व (४) सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अहमदनगर, धुळे, नंदूरबार, बीड व अमरावती या जिल्हयांमध्ये सुधारित अन्नधान्य वितरण योजना कार्यान्वित झालेली नाही. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना विहित परिमाणानुसार जिल्हानिहाय नियतन देण्यात येत आहे. तसेच, अन्न जिल्हयात सुधारित धान्य वितरण पध्दतीनुसार वाहतूकीची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

---

## लातूर जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाच्या दवाखान्यांची झालेली दुरवस्था

**(४३) १६७२ (२७-०१-२०१५). डॉ. सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाचे १२२ पशु दवाखाने आहे, यातील ८८ दवाखान्यांची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तांदुळजा, हडाळती, बेलकुंड, लांबोटा, भाकरंबा, चाकूर या सह पशू चिकित्सालयाच्या दुरुस्तीसाठी आणि अन्य साहित्य खरेदीसाठी १३ व्या वित्त आयोगातून निधीचा प्रस्ताव होता, जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेने त्याला मंजूरी दिलेली होती, मात्र प्रशासकीय मान्यते अभावी या सहाही दवाखान्यांच्या कामाला प्रारंभ होऊ शकला नाही हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्र शासनाचे ७५ व राज्य शासनाचे २५ टक्के अनुदानावर हंडरगुळी, दावणगाव, जळकोट, नळगीर, चापोली, शिरुर अनंतपाळ या दवाखान्याच्या दुरुस्तीसाठी काहीही निर्णय झालेला नाही हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वरील प्रस्तावांना मान्यता न मिळण्याची कारणे काय आहेत,
(५) सदरहू प्रस्तावांना तातडीने मान्यता मिळण्याच्या दृष्टीने शासनाने काय कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२७-०१-२०१५) :**(१) होय, हे अंशतः खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
सन २०१२-१३ मध्ये राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या बळकटीकरण या केंद्र व राज्य पुरस्कृत योजनेतून प्रत्येकी रु. ४.०० लक्ष निधी उपलब्ध झाला होता. त्यास दि. २६.२.२०१३ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्याप्रमाणे कामे झालेली आहेत व निधी खर्च झालेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईसह महाराष्ट्र राज्यात दूधभेसळीच्या प्रमाणात वाढ होत असल्याबाबत

**(४४) १७०९ (२३-१२-२०१४). श्री. बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह महाराष्ट्र राज्यात दूधभेसळीच्या प्रमाणात वाढ होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आता पर्यंत राज्य शासनाने भेसळ दुधाचे उत्पादन आणि विक्रीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट (१२-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ नियम व नियमन २०११ मधील कलम ३१ अन्वये प्रत्येक दूध उत्पादकास परवाना/नोंदणी आवश्यक आहे.

अन्न व औषध प्रशासनातर्फे वेळोवेळी दूध उत्पादक, वितरक, किरकोळ विक्रेते यांच्या नियमित तपासण्या करुन अन्न नमुने घेण्याची कारवाई निरंतर केली जाते. तसेच पर राज्यातून येणा-या दूधाची जकात नाक्यावर तपासणी मोहिम वेळोवेळी राबविण्यात येते. सणासुदीच्या दिवसात दूध व दुग्धजन्य पदार्थ्यांचे नमुने घेण्याची विशेश मोहिम राज्यभर राबविण्यात येते. सदर कायदा लागू झाल्यापासून दि.०५ ऑगस्ट, २०११ ते ३० नोव्हेंबर, २०१४ या कालावधीत केलेल्या तपासणी राज्यात ३७०१ दुधाचे नमुन्यापैकी ८९० मानदाप्रमाणे नसल्याचे व११५ नुमने खाण्यास अयोग्य असल्याचे आढळून आले.

कमी दर्जाच्या आढळून आलेल्या नमुन्याप्रकरणी न्यायनिर्णय कारवाई करुन रु.४४,१७,०००/- व तडतोड कारवाई होवून रु.९,२९,८८५/- दंड वसूल करण्यात आली असुरक्षित आढळूनन आलेल्या ९१ प्रकरणी संबंधिताविरुध्द विविध न्यायलयात खटले दाखल करण्यात आले आहेत.

---

**शहापूर तालुक्यातील (जि.ठाणे) पशुवैद्यकीय चिकित्सालयाच्या**
**इमारतीची दुर्दशा झाल्याबाबत**

**(४५) १७१२ (२७-०१-२०१५). श्री. बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर तालुक्यातील (जि.ठाणे) शेतक-यांना लाभदायक ठरणा-या पशुवैद्यकीय चिकित्सालयाच्या नवीन इमारतीसाठी तब्बल ८० लाख रूपयांचा निधी तसेच बांधकाम आराखडा मंजूर असूनही केवळ ही जागा वनखात्यांतर्गत येत असल्याने येथे चिकित्सालयाची नवीन इमारत बांधणे अशक्य असल्याची बाब माहे नोव्हेंबर २०१४ मध्ये उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याची चौकशी वा पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने शासनाकडून अद्याप कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही.

शहापूर तालुक्यात खुटघर व वासिंद येथे अनुक्रमे पशुवैद्यकीय उपकेंद्र इमारत बांधणे व पशुवैद्यकीय दवाखान्यासंदर्भात प्रस्ताव अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ चे कलम ३(२) अंतर्गत अनुक्रमे दि. १५.३.२०११ व १३.११.२०१२ रोजी प्राप्त झाला होता. सदर प्रस्ताव अपूर्ण असल्याने पूर्ततेसाठी संबंधित यंत्रणेकडे परत पाठविण्यात आला असून परिपूर्ण प्रस्ताव अद्याप अप्राप्त आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतीत १२ वर्षापासून कोंडून ठेवलेल्या महिलेची करण्यात आलेली सुटका**

**(४६) १७१८ (२३-१२-२०१४). श्री. बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील औद्योगिक वसाहत क्र.२ मधील अब्दुल मोबीन अन्सारी यांच्या मालकीच्या कोरमंडल ॲग्रोच्या गोडावून मध्ये १२ वर्षापासून अंधार कोठाडीत कोंडून ठेवलेल्या महिलेला माहे नोव्हेंबर, २०१४ दरम्यान सोडविण्यात राज्य महिला आयोगाच्या सदस्या डॉ.आशाताई मिरगे यांना यश आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणाऱ्या व्यक्तीवर शासनाकडून कोणती कारवाई करण्यात येणार आहे वा आली आहे,

(४) नसल्यास, दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०३-२०१५) :** (१), (२), (३) व (४) डॉ. आशाताई मिरगे, सदस्या राज्य महिला आयोग, महाराष्ट्र राज्य यांनी, दिनांक १२.११.२०१४ रोजी पोलीस स्टेशन, सिव्हिल लाईन, अकोला येथे दिलेल्या लेखी अर्जानुसार पोलीसांनी तपास केला असता, मागील १२ वर्षापासून घरात कोंडून ठेवल्याची बाब उघडकीस आली आहे सदर महिलेची दिनांक १३.११.२०१४ रोजी सुटका करुन तिला सर्वोपचार रुग्णालयात, अकोला येथी दाखल करण्यात आले होते. सदरची महिला मनोरुग्ण असल्याबाबतचे प्रमाणपत्र वैद्यकिय अधिकारी यांनी दिले असून, मा.मुख्य न्यायदंडाधीकारी, अकोला यांचे आदेशानूसर प्रादेशिक मनोरुग्ण रुग्णालय, नागपूर येथे पुढील उपचाराकरीता दिनांक १९.११.२०१४ रोजी दाखल करण्यात आले आहे. पिडीत महिला काहीही सांगण्याच्या परिस्थितीत नसल्याने व या संबंधाने पोलीस स्टेशनला कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त नसल्याने कार्यवाही करण्यात आलेली नाही.

---

**भातकुली (जि. अमरावती) येथील उप कृषी बाजार समितीचे केंद्र सुरु करण्याबाबत**

**(४७) १७३७ (२२-१२-२०१४). श्री. रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भातकुली (जि. अमरावती) येथील उप कृषी बाजार समितीचे केंद्र अनेक वर्षापासून बंद असून तेथील परिसरातील शेतकऱ्यांना आपला माल अमरावती येथे घेऊन जावे लागत असल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक भार, शारिरिक कष्ट सहन करावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार उप कृषी बाजारा समितीचे केंद्र लवकरात लवकर सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू केंद्र केव्हापर्यंत सुरु होणे अपेक्षित आहे?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०२-२०१५) :** (१) भातकुली येथे फक्त कापूस खरेदीचे नियमन करण्यात आलेले आहे. परंतु कापूस एकाधिकार खरेदी बंद झाल्याने तेथील खरेदी केंद्र बंद आहे. अमरावती बाजार समितीत स्पर्धात्मक भाव मिळत असल्याने सर्व शेतमाल अमरावती बाजार समिती विक्रीसाठी जातो.

(२) कापूस एकाधिकार खरेदी बंद झाल्यामुळे कापूस केंद्र बंद झाले आहे. परंतु शेतमाल खरेदीबाबत बाजार समितीने प्रयत्न केले असता आवक न झाल्यामुळे व्यवहार सुरु झालेली नाही.

(३) शेतक-यांची मागणी व व्यापारी यांची खरेदीची तयारी असल्यास पुढील कार्यवाही करता येईल.

---

**अमरावती जिल्ह्यातील ऋणमोचन (ता. भातकुली) तसेच कोंडेश्वर ता. अमरावती या दोन्ही "ब" वर्ग पर्यटन स्थळाला निधि मिळण्याबाबत.**

**(४८) १७३९ (२२-१२-२०१४). श्री. रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील ऋणमोचन ता. भातकुली तसेच कोंडेश्वर ता. अमरावती या दोन्ही "ब" वर्ग पर्यटन स्थळाला " निधि मिळण्यासाठी कृती विकास आराखडा मंजूर केला परतू शासनाकडे संबधित लोकप्रतिनिधींनी विकास निधी मिळण्याची मागणी करुनही निधी मिळाला नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी न मिळाल्याची कारणे काय तसेच पुरवणी यादीमध्ये निधी मिळण्यासाठी शासनाने कारवाई केली काय वा करणार आहे,

(३) धार्मिक स्थळे विकास निधीची तरतूद किती याबाबत थोडक्यात माहिती?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) शासन निर्णय दिनांक १६ नोव्हेंबर, २०१२ अन्वये "ब" वर्ग ग्रामीण तीर्थक्षेत्रांना निधी देण्याची मर्यादा रु. १.०० कोटीवरुन रु. २.०० कोटी इतकी करण्यात आली आहे.

तीर्थक्षेत्र कोंडेश्वर, ता.जि.अमरावती या तीर्थक्षेत्रात सन २००७-०८ या मध्ये रु. ८८.५२ लक्ष व सन २००८-०९ मध्ये रु. १२२.५१ लक्ष असा एकूण रु. २११.०३ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. सदर तीर्थक्षेत्रात मर्यादेपेक्षा जास्त निधी दिला असल्याने, योजनेतील तरतूदीनुसार जास्त निधी देता येणे शक्य होणार नाही.

तीर्थक्षेत्र ऋणमोचन, ता.भातकुली, जि. अमरावती या तीर्थक्षेत्रात सन २०१०-११ मध्ये रु.२३.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. सदर तीर्थक्षेत्रास दिनांक १६ नोव्हेंबर, २०१२ पूर्वी "ब" वर्ग दर्जा दिला असल्याने रु. १.०० कोटी इतक्या मर्यादेपर्यत निधी उपलब्ध करुन देता येईल. तरी रु. १.०० कोटीच्या मर्यादेत उर्वरित रु. ७७.०० लक्ष इतक्या निधीच्या कामांची अंदाजपत्रके सादर करण्याबाबत जिल्हा परिषद, अमरावती यांना कळविण्यात आले आहे.

(३) शासन निर्णय दिनांक १६ नोव्हेंबर, २०१२ अन्वये "ब" वर्ग ग्रामीण तीर्थक्षेत्रांना निधी देण्याची मर्यादा रु. १.०० कोटी वरुन रु. २.०० कोटी इतकी करण्यात आली आहे.

---

## पेण (जि. रायगड) तालुक्यातील शेतकऱ्यांनी हटवणे मध्यम प्रकल्पाचे पाणी शेतीकरिता मिळण्याकरिता केलेली मागणी

**(४९) १७५८ (२३-१२-२०१४). श्री. धैर्यशील पाटील (पेण), श्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि. रायगड) तालुक्यातील शेतकऱ्यांनी हटवणे मध्यम प्रकल्पाचे पाणी शेतीकरिता मिळावे हया मागणीसाठी दिनांक ९ फेब्रुवारी, २०१३ रोजी पायी चालत पेण ते मा. मुख्यमंत्री यांचे मुंबई निवासस्थानापर्यंत मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मोर्चाच्या सर्वसाधारण मागण्या काय होत्या,

(३) त्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना व कार्यवाही केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०२-२०१५) :**(१) होय.

(२) हेटवणे धरणाचे शेतीसाठी व पिण्यासाठी आरक्षित असलेले पाणी सिंचनासाठी व पिण्याकरीता देण्यासाठीची मागणी होती.

(३) धरणाचे काम २००२ साली पूर्ण होऊन पाणीसाठा करण्यात येत आहे. कालव्याची कामे अंशतः पूर्ण असून ११२४ हे. (ICA) सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. शेतक-यांना प्रत्यक्ष मागणीनुसार सन २०१३-१४ मध्ये कोकण हंगामात सिंचन करण्यात आले आहे. भूसंपादन कार्यवाही पूर्ण करुन यापुढील सिंचन क्षमता निर्माण करण्याचे नियोजन आहे. घरगुती

पाण्याची मागणी ज्याप्रमाणे प्राप्त होईल त्यानुसार शासन धोरणाप्रमाणे प्राधान्याने मान्यता देण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत  नाही.

---

**खारभूमी योजना सुस्थितीत नसल्याने भातपिकाखालील शेतीच्या होत असलेल्या नुकसानीबाबत**

**(५०) १७६४ (१५-०१-२०१५). श्री. धैर्यशील पाटील (पेण), श्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हयातील अलिबाग, उरण, पेण, वर्धन, व मुरुड आदि तालुक्यातील समुद्रालगतच्या भातशेती मध्ये समुद्राचे खारपाणी शिरल्याने भातशेती क्षेत्राचे मोठया प्रमाणात नुकसान सतत होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खारभूमी योजनांसाठी आवश्यक निधी उपलब्ध होत नसल्याने खारभूमी योजना व बाहेरकाठांची निगा व दुरुस्ती राखली जात नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, रायगड जिल्हयातील नादुरुस्त खारभूमी योजना व बांधबंदीस्तीसाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली जात आहे,
(४) नसल्यास, कार्यवाही न होण्याची कारणे काय ?

**श्री. गिरीष महाजन (२६-०२-२०१५) :**(१) हे अंशतः खरे.
(२) नाही.
(३) खारभूमी योजनांची तातडीच्या दुरुस्तीची कामे देखभाल व दुरुस्ती करिता उपलब्ध अनुदानातून करण्यात येतात. तसेच, रायगड जिल्हयातील नाबार्ड- १६, १७ व १९ अंतर्गत २८ योजनांचे नुतनीकरण कामे प्रगतीपथावर आहेत.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.